महाराष्ट्र शासन

# महसूल विभाग

## विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचे कार्यालय (करमणुक शुल्क शाखा)

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, भारत प्रतिभूती मुद्रणालयासमोर, नाशिकरोड, ता.जि.नाशिक-४२२ १०१
Email ID- dycomentnashik@gmail.com दुरध्वनी क्र. ०२५३-२४६२४०१-५

क्र.कक्ष-१५/क.शु.१/ज.या.१७६-२०१२/कावि/३६३/२०२२ नाशिकरोड दि.२७/१०/२०२२

इमेलव्दारे

प्रति,

१. आयुक्त, नाशिक महानगरपालिका नाशिक
२. जिल्हाधिकारी नाशिक
३. पोलिस आयुक्त, नाशिक
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
५. प्रादेशिक अधिकारी, महा.प्र.नि.मं. (MPCB) नाशिक
६. अधिक्षक अभियंता व प्रशासक (लाक्षेविप्रा) नाशिक
७. उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, नाशिक
८. कार्यकारी अभियंता, महा.औ.वि.म.(MIDC) नाशिक
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, ना.म्यु.स्मार्ट सिटी नाशिक
१०. मुख्य अभियंता, निर्मिती, ना.औ.विद्युत केंद्र एकलहरे
११. सहसंचालक नगररचना, नाशिक विभाग नाशिक
१२. उपसंचालक, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, नाशिक
१३. शिक्षण उप संचालक, नाशिक विभाग नाशिक
१४. अधिक्षक अभियंता, जलसंपदा विभाग नाशिक
१५. मुख्याधिकारी, देवळाली छावणी मंडळ, नाशिक
१६ जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक
१७. निरी (NEERI) मुंबई यांचे प्रतिनिधी
१८. डॉ. प्राजक्ता बस्ते, प्राचार्य आर्किटेक्चर कॉलेज नाशिक
१९. श्री. राजेश पंडीत, याचिकाकर्ते
२०. श्री. निशिकांत पगारे, याचिकाकर्ते

विषय :- **गोदावरी नदीचे प्रदूषण नियंत्रणाबाबत आढावा बैठकीचे इतिवृत्त..**
मा.उच्च न्यायालय मुंबई जनहित याचिका क्र.१७६/२०१२ संदर्भात..

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, गोदावरी नदी प्रदूषण बाबत जनहित याचिका क्र.१७६/२०१२ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि.१८ डिसेंबर, २०१८ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन मा.विभागीय आयुक्त नाशिक यांचे अध्यक्षतेखाली गोदावरी नदी प्रदूषण नियंत्रणाबाबत समितीची त्रैमासिक आढावा बैठक दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी घेण्यात आलेली आहे. सदर बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत पाठविण्यात येत आहे.

बैठकीतील सुचने प्रमाणे आपण केलेल्या / करत असलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल संबधीत कागदपत्र, छायाचित्रांसह या कार्यालयास सादर करावा, ही विनंती.

( रमेश काळे )
उपआयुक्त (करमणुक शुल्क)
विभागीय आयुक्त नाशिक करिता

उपआयुक्त (गो.सं.कक्ष)
नाशिक महानगरपालिका,नाशिक

गोदावरी संवर्धन कक्ष
आवक क्र. 323 दि. २८/१०/२०२२
जावक क्र. दि. / /

Scanned by CamScanner

विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचे कार्यालय

**मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील जनहित याचिका क्र.176/2012 संदर्भात विभागीय आयुक्त, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली गोदावरी नदी प्रदुषण नियंत्रणाबाबत दि.14/10/2022 रोजी झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त**

---X-X-X-X---

गोदावरी नदी प्रदुषण नियंत्रणाबाबत आढावा घेणेसाठी श्री. राधाकृष्ण गमे, विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली **दि.14/10/2022 रोजी दुपारी 3.30 वाजता** विभागीय आयुक्त कार्यालय येथील समिती कक्षात बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस खालील अधिकारी यांनी उपस्थिती नोंदवली.

1. आयुक्त, महानगरपालिका नाशिक
2. जिल्हाधिकारी, नाशिक (व्ही.सी.व्दारे)
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
4. श्री. रमेश काळे, उप आयुक्त (करमणूक शुल्क ) नाशिक
5. श्रीमती. अलका अहिरराव, अधिक्षक अभियंता व प्रशासक, लाक्षेविप्राना, जलसंपदा विभाग, नाशिक
6. श्री. रविंद्र आंधळे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ नाशिक
7. श्री. अमर दुर्गुळे, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ नाशिक
8. डॉ. वर्षा फडोळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक
9. डॉ.नितीन गोयल, प्रमुख शास्त्रज्ञ, निरी मुंबई (व्ही.सी.व्दारे)
10. श्री. जयवंत बोरसे, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ नाशिक
11. श्री.दिवाकर धोटे, उपसंचालक, भुजल सर्वेक्षण विकास यंत्रणा नाशिक
12. श्री. ज्ञा.ना.इगवे, उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय नाशिक
13. श्रीमती मोहिनी राणे, सहाय्यक संचालक, विभागीय माहिती कार्यालय नाशिक
14. श्रीमती पी.एम.पाटील, सहाय्यक संचालक, शिक्षण उप संचालक कार्यालय, नाशिक
15. डॉ. विजयकुमार मुंडे, उपआयुक्त, गोदावरी संवर्धन कक्ष, महानगरपालिका, नाशिक
16. श्री. एस.एम.चव्हाणके अधिक्षक अभियंता, महानगरपालिका, नाशिक
17. श्री. सुमंत मोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी, ना.म्यु.स्मार्ट सिटी डेव्ह.कॉ.लि.नाशिक
18. श्रीमती सुनिता धनगर, प्रशासनाधिकारी, शिक्षण विभाग, महानगरपालिका, नाशिक
19. श्री.के.बी.चौधरी, व.पो.नि. विशेष शाखा, प्रतिनिधी पोलिस आयुक्त नाशिक
20. श्री.लाला झाल्टे, वरिष्ठ रसायनतज्ञ, प्रतिनिधी, मुख्य अभियंता निर्मिती, नाशिक औष्णिक विद्युत केंद्र एकलहरे
21. श्री.भूनेष बी. नेरकर, कनिष्ठ अभियंता, प्रतिनिधी मुख्याधिकारी देवळाली छावणी मंडळ नाशिक
22. श्री. राजेश पंडीत, याचिकाकर्ते
23. श्री. निशिकांत पगारे, याचिकाकर्ते

बैठकीच्या सुरुवातीस उपस्थिती बाबत आढावा घेण्यात आला. दि.२७/०७/२०२२ रोजीचे बैठकीवेळी मागील बैठकीचे इतिवृत्तात दिलेल्या निर्देशांवर संबंधित यंत्रणांनी केलेल्या कार्यवाहीनुसार मुद्देनिहाय आढावा घेण्यात

Scanned by CamScanner

आला होता. आजच्या बैठकीत संबंधित नियुक्त विभागीय उपसमित्या/यंत्रणा यांनी मागील बैठकीतील सुचनेच्या अनुषंगाने केलेल्या कामकाजाचा आढावा घेण्याचे ठरविण्यात आले.

| मुद्दा क्रमांक | झालेली चर्चा व दिलेल्या सूचना | कार्यवाहक विभाग/ यंत्रणा/अधिकारी |
|---|---|---|
| १ | **नाशिक महानगर पालिका स्तरावरील उपसमिती संबंधीत मुद्दे-**<br>श्री.मुंडे, उपायुक्त गोदावरी संवर्धन कक्ष यांनी पुढील प्रमाणे माहिती दिली.<br>१) दि.३०/०९/२०२२ रोजी महापालिकेच्या उपसमितीची बैठक झाली असुन त्यामध्ये श्री.पंडीत यांनी STP अपग्रेडेशन व गोदावरीत जाणाऱ्या Strom Water बाबत करीत असलेल्या उपाययोजना संबंधीत मुद्दा उपस्थित केला होता. त्याअनुषंगाने श्री.चव्हाणके यांनी STP अपग्रेडेशन बाबतचा DPR हा केंद्र शासनास सादर केला असल्याची माहिती दिली होती. तसेच पावसाळ्यापुर्वी तीन महिने सार्वजनिक बांधकाम व मलनि:स्सारण विभागातर्फे पावसाळी गटारमार्फत सांडपाणी नाल्यात मिसळणारी ठिकाणे शोधुन बंद करण्यात येत असल्याचे सांगितले. | आयुक्त महानगरपालिका, |
| | केंद्र शासनाचे संबंधीत विभागाने DPR प्रस्ताव तपासला असुन त्यामध्ये काही त्रुटी काढल्या आहेत. त्रुटींची पुर्तता करुन सुधारीत प्रस्ताव ११ तारखेपर्यंत सादर करण्यास त्यांनी सांगितले होते. तथापी DPR मध्ये काढलेल्या त्रुटींची पुर्तता करण्यास वेळ लागणार असल्याने १५ दिवसांची वेळ मागुन घेतली असल्याचे मनपा आयुक्त यांनी खुलासा केला. | आयुक्त महानगरपालिका, |
| | • STP अपग्रेडेशन बाबत सुधारीत DPR प्रस्ताव केंद्र शासनास पाठवतांना तो अगोदर निरी संस्थेकडून तपासुन घ्यावा. सर्व त्रुटींची पुर्तता झाल्याची खात्री करुनच प्रस्ताव केंद्र शासनास सादर करावा. तसेच STP संबंधातील निरीचा यापुर्वीचा अहवाल देखील प्रस्तावासोबत जोडून पाठवावा. सदरची कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करावी. | आयुक्त महानगरपालिका, NEERI |
| | २) ५० ठिकाणी नदीपत्रात पाणी जात असल्याबाबत श्री.पगारे यांनी मुद्दा उपस्थित केला होता. त्याबाबत Strom Water व्दारे नाल्यात मिसळणाऱ्या सांडपाण्याची प्रत्यक्षात तपासणीत ६० ठिकाणे आढळून आलेली आहेत. त्यापैकी ३५ ठिकाणांची कामे पावसाळ्यापुर्वी पुर्ण केली असुन बाकीची २५ ठिकाणे आता पावसाळ्यानंतर करणार आहोत. काही ठिकाणी Sewage line नसल्याने लोकांनी Strom water ला ड्रेनेज जोडले आहे. ती ठिकाणे शोधली असुन तेथे पावसाळ्यानंतर Sewage line टाकत असल्याची माहिती दिली श्री.मुंडे यांनी दिली. | आयुक्त महानगरपालिका, |
| | • उर्वरित ठिकाणांची कामे तातडीने पुर्ण करावी. नदी पत्रात विना प्रक्रिया केलेले सांडपाणी जाणार नाही याची काळजी घ्यावी. | आयुक्त महानगरपालिका |
| | • तसेच सांडपाण्याचे ऑडीट करणे गरजेचे आहे. नदीपात्रातुन उचल होणारे पाणी, प्रक्रिया केलेले पाणी व प्रक्रिया करुन पुन्हा नदीत सोडण्यात येणारे पाणी यांचा हिशोब दिला पाहिजे. सर्व नद्यांचे पाण्याचा ऑडीट संबंधीची माहिती पुढील बैठकीपुर्वी देण्यात यावी. | आयुक्त महानगरपालिका |
| | ३) प्लास्टीक व रासायनीक कचरा नदीपात्रात मिसळू नये यासाठी विद्यार्थी व नागरीकांमध्ये जनजागृतीच्या संदर्भात चर्चा झाली होती. प्लास्टीक कचराबाबत महापालिकेच्या घनकचरा विभागामार्फत कारवाई चालू आहे. सिंगल युज प्लास्टीक वापरु नये याबाबत वर्तमानपत्रातुन वेळोवेळी जाहीर आवाहन करण्यात येते. त्याअनुषंगाने बातम्या दिल्या जातात. सिंगल युज प्लास्टीक बाबत नियमित दंडात्मक कारवाई देखील करण्यात येते. याबाबत अहवाल एमपीसीबी कडे नियमित पाठविला जातो. नाशिकमध्ये प्लास्टीक बंदी बाबत इतर शहरांच्या मानाने चांगल्या प्रकारे कारवाई चालू असल्याचे एमपीसीबीचे अधिकारी यांनी बैठकीचे दिवशी सांगितले असल्याचे श्री.मुंडे यांनी नमुद केले. | आयुक्त महानगरपालिका |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | महापालिकेकडून जनजागृती, प्रबोधन नियमित करण्यात येत असुन दोषी आढळणाऱ्या नागरीक व आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येत असलेबाबत मनपा आयुक्त यांनी खुलासा केला.<br>श्री.पगारे यांनी दंडाबरोबर नागरीकांमध्ये जगजागृती सुध्दा होणे गरजेचे असुन शहरातील विभागीय पातळीवरील समित्या कार्यन्वीत करुन जास्तीत जास्त लोकांना प्लास्टिक पिशवी ऐवजी कापडी पिशवी वापरावी यापध्दतीने जनजागृती केली पाहिजे अशी सुचना केली.<br>श्री.पंडीत यांनी प्लास्टिक वापराबाबत छोट्या व्यापाऱ्यांवर कारवाई होत असते त्याऐवजी उत्पादक/घाऊक व्यापारी आहेत त्यांचेवर मोठ्या प्रमाणात कारवाई झाली पाहिजे अशी सुचना केली.<br>**एमपीसीबीचे उपप्रादेशिक अधिकारी श्री.दुर्गुळे यांनी खालील प्रमाणे खुलासा केला.**<br>प्लास्टिकचे वापरा संदर्भात दोन बैठका घेण्यात आल्या असुन मागच्या आठवड्यातच जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सोबत बैठक झाली आहे. यापुर्वी एक बैठक महानगर पालिकेसोबत देखील झालेली आहे. प्लास्टिक वापराबाबत जे काही व्यापारी किंवा दुकानदार आहेत त्यांची तपासणी करण्यात येत आहे. प्लास्टिकला पर्याय म्हणुन आपण काही कंपन्यांना त्यांचे CSR मधुन पिशव्या बनविण्यास सांगितले आहे. त्यापैकी १-२ कंपन्यांनी ५००० कापडी पिशव्या बनवून त्या वाटपाला दिल्या आहेत. काही कंपन्यांच्या ऑर्डर आता होत आहे. नागरीक, व्यापारी यांना पर्याय देणे आवश्यक आहे. तसेच केंद्रीय प्रदुषण मंडळाने एक नोटीस दिली आहे. त्यामध्ये १७ ते २० तारखेपर्यंत सर्व घाऊक, किरकोळ व उत्पादक असे तीन दिवस मोहिम राबविण्यास सांगितले आहे. महानगर पालिकेबरोबर आपण ६ पथके केलेली आहेत. सोमवार पासुन ६ पथकांबरोबर त्याची अंमलबजावणी चालू होईल असे सांगितले.<br>सोशल मिडीयामध्ये दक्षिण भारतात एटीएम सारखे कापडी पिशव्यांचे मशीन बसविल्याची बातमी आहे. सदर मशीन कोठे तयार होत याचा तपास करुन महापालिकेच्या वतीने काही ठिकाणी सदरच्या मशिन बसविता येतील असे मनपा आयुक्त यांनी सांगितले.<br>• प्लास्टिक ऐवजी कापडी पिशव्या वापरण्याबाबत महापालिकेने जनजागृती करावी. तसेच महापालिकेच्या विभागीय कार्यालयांना सदरची मशीन बसविण्याची कार्यवाही करावी. मॉल्स, मोठे स्टोअर्स यांना सदरच्या मशिन बसविणे अनिवार्य करावे.<br>• एमपीसीबी व महापालिका यांनी प्लास्टिकचे वापराबाबत नियमित कारवाई करावी. | आयुक्त महानगरपालिका<br><br>प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ<br><br>आयुक्त महानगरपालिका<br><br>आयुक्त महानगरपालिका, प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | **ग्रामीण भागातील प्लास्टिक कचरा संदर्भात जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती फडोळ यांनी खालील प्रमाणे खुलासा केला.**<br>४) ग्रामीण भागात प्रत्येक तालुक्याला प्लास्टीक कचरा व्यवस्थापनासाठी एक युनिट अगोदरच मंजुर आहे. त्यामध्ये सद्या मशीन घेण्याची कार्यवाही सुरू आहे. महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्यामध्ये सर्वात अगोदर कार्यवाही होणारअसल्याचे सांगितले.<br>• प्रायोगिक तत्वावर इगतपुरी तालुक्यात प्राधान्याने कार्यवाही करावी. भंडारदरा येथे जे प्लास्टीक कचरा संकलन होईल ते ही इगतपुरीला घेता येईल. इगतपुरी तालुक्यातील काम लवकर पुर्ण करावे. | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद<br><br>मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद |
| | ५) नदी पत्रातील पाणवेली काढण्यासाठी ट्रॅश स्किमर बाबतचा विषय झाला होता. ट्रॅश स्कीमर आता स्मार्ट सिटीचे ताब्यात आहे. ते महानगर पालिकेला हस्तांतरीत करुन पाणवेली काढण्यासाठी ट्रॅश स्कीमरचा वापर करण्यात येणार असल्याचे श्री.मुंडे यांनी सांगितले.<br>• ट्रॅश स्कीमर किती तास चालते, किती इंधन खर्च झाले, नदी पत्रातुन किती प्रमाणात पाणवेली बाहेर काढल्या तसेच काढलेल्या पाणवेलींचे कंम्पोस्ट केले का अशी आकडेवारी देता आली पाहिजे. तशी कार्यपध्दती विकसीत करुन यापुढे प्रत्येक | आयुक्त महानगरपालिका<br><br>आयुक्त महानगरपालिका |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | मिटींगला ती आकडेवारी देण्यात यावी. | |
| | ६) शहरातील भूजल पातळी वाढविणेबाबत चर्चा झाली होती. याबाबत क्रेडाई नाशिक आणि बिल्डर्स असोसिएशन यांची मदत घेता येईल, भूजल पातळी वाढली तर निश्चितपणे गोदावरीचा नैसर्गिक प्रवाह वाढणार आहे. शहरात ज्या काही खुल्या जागा आहे त्या ठिकाणी रेनवॉटर हार्वेस्टिंग जास्तीत जास्त झाली तर त्याठिकाणाची भूजल पातळी वाढेल असे श्री.मुंडे यांनी नमुद केले.<br>• कॉंक्रीटीकरण, पेवर ब्लॉक व भुयारी गटार योजनेमुळे शहरात पाणी मुरण्याचे प्रमाणे कमी झालेले आहे. त्यामुळे ज्या खुल्या जागा आहेत तेथे रेनवॉटर हार्वेस्टिंग करण्यासोबतचे महानगरपालिकेने आत्तापर्यंत ज्यांना बांधकाम कम्पलिशन परवानगी दिलेल्या आहेत अशा मोठ्या सोसायटी, मोठ्या कॉलनी यांनी रेन वॉटर हार्वेस्टिंग बसविणेबाबत कार्यवाही केली आहे किंवा नाही. तसेच त्यांचे रेन वॉर्टर हार्वेस्टिंग कार्यरत आहे किंवा नाही याबाबत मोहीम घेऊन तपासणी करावी. तसेच ज्या-ज्या ठिकाणी STP अनिवार्य केले आहे ते ही कार्यरत आहे किंवा नाही याची देखील तपासणी करावी. STP व रेन वॉर्टर हार्वेस्टिंग कार्यरत नसेल तर त्याबाबत युनिफाईड डीसीपीआर व हेमाटिपी ॲक्ट मध्ये दंडाची देखील तरतुद असल्याने नियमानुसार तशी कार्यवाही करावी. पुढील बैठकीच्या वेळेस कारवाईची आकडेवारी देण्यात यावी. | आयुक्त महानगरपालिका<br><br>आयुक्त महानगरपालिका |
| | ७) मनपा शिक्षण विभागाने गोदावरी संवर्धना संदर्भात शाळांमध्ये जनजागृतीचे अनुषंगाने मोहिम राबविली असुन गोदावरीचे गीत तयार केले आहे. मनपाच्या शिक्षीकेने ते लिहीले असुन श्री.संजय गिते यांनी संगीतबध्द केले आहे. मनपाच्या सर्व शाळांमध्ये प्रार्थनेच्यावेळी सदर गीत गायले जात असल्याचे मनपा आयुक्त यांनी सांगितले. सदरवेळी गीताचे ऑनलाईन सादरीकरण करण्यात आले.<br>• सदर गीताची माहिती कार्यालयामार्फत प्रसिध्दी करण्यात यावी. | आयुक्त महानगरपालिका<br><br>आयुक्त महानगरपालिका<br>उपसंचालक माहिती |
| | ८) गोदावरी संवर्धनाबाबत वेबसाईट तयार करुन तक्रारीसाठी पोर्टल तयार करणे व या संदर्भात महापालिकेकडून जी कामे करण्यात येत आहे ती वेबसाईटवर प्रसिध्द करणे या मुद्याबाबत विचारणा करण्यात आली.<br>त्याअनुषंगाने गोदावरी संवर्धनाबाबत वेबसाईट तयार करुन प्रसिध्द केली आहे. तसेच तक्रारीसाठी पोर्टल देखील तयार करलेले असुन महापालिकेकडून करण्यात आलेल्या कामांची देखील प्रसिध्दी वेबसाईटवर नियमित अपलोड करण्यात येत असल्याचे श्री.मुंडे यांनी सांगितले.<br>तक्रार आल्यानंतर तीच्यावर कार्यवाही केली जाते सदरच्या कार्यवाहीची देखील प्रसिध्दी देण्याबाबत श्री.पंडीत यांनी सुचना केली.<br>• गोदा संवर्धनाबाबत महापालिकेकडून करण्यात येणाऱ्या कामाबाबत वेबसाईटवर नियमीतरित्या प्रसिध्दी देण्यात यावी. तक्रारींच्या कार्यवाहीबाबत देखील प्रसिध्दी देण्यात यावी. जेणेकरुन समाधानकारक निर्गत केलेल्या तक्रारींवरुन केलेल्या कामाची गुणवत्ता व सकारात्मकता दिसुन येईल. | आयुक्त महानगरपालिका<br><br>आयुक्त महानगरपालिका |
| | ९) लेंडी नाला बाबत एक वर्षापुर्वी दि.१८/१०/२०२१ रोजी पत्र दिले असुन आजही लेंडी नाला मधुन सांडपाणी सुरु असलेबाबत श्री.पगारे यांनी नमुद केले. एक वर्ष झाले होऊनही नाला बंद होत नाही. त्यामुळे संबंधीत महापालिकेचे अधिकारी, स्मार्ट सिटीचे अधिकारी व त्यांचेवर कारवाई न करणारे एमपीसीबीचे अधिकारी यांचेवर कारवाई झाली पाहिजे, त्यांना दंड झाला पाहिजे असा मुद्दा श्री.पगारे यांनी उपस्थित केला.<br>**याबाबत स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.मोरे यांनी खुलासा केला की** स्मार्ट सिटीने लेंडी नाल्या पासुनचे सगळे सांडपाणी बंद करुन घेतले आहे. पुढील बाजुचे सर्व काम झाले आहे. पाठीमागील बाजुस नाल्यावर लोकांनी अतिक्रमण केलेले असल्याने तेथील काम बाकी असल्याचे सांगितले. पाठीमागे बंद केलेले नसल्याने पाणी येत आहे. लोखंडी पुलापासुन पुढचे सर्व काम केलेले असल्याचा खुलासा केला. | मुख्य कार्यकारी अधिकारी, स्मार्ट सिटी |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | पावसाळ्यात चार महीने अतिक्रमण काढता येत नाही. आता पावसाळा संपला आहे मोहिम सगळीकडे सुरु आहे. स्मार्ट सिटी व महापालिकेने समन्वय ठेऊन मोहीम घेऊन अतिक्रमण काढून घ्यावे असे मनपा आयुक्त यांनी सांगितले.<br>• मागील बाजुचेही काम पुर्ण करावे. सदर नाल्याचे कामाची महापालिका व स्मार्टसिटी दोघांचीही जबाबदारी आहे. महापालिकेने नाल्यावरील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही तातडीने करावी. लेंडीनाल्याचे स्मार्टसिटीने केलेले कामाची महापालिका आयुक्त यांनी भेट देऊन पाहाणी करावी. स्मार्ट सिटी व महापालिकेने समन्वय ठेऊन लेंडी नाल्याचे काम पुर्ण करावे.<br>• महापालिका उपसमितीने सर्व सदस्यांसमवेत लेंडी नाल्याची संयुक्त पाहणी करुन महापालिका आयुक्तांनी पुढील कार्यवाही करावी. | आयुक्त महानगरपालिका<br><br>आयुक्त महानगरपालिका, मुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी<br><br>महापालिका उपसमिती, आयुक्त महानगरपालिका |
| २ | **महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ स्तरावरील उपसमिती संबंधीत मुद्दे-**<br>१) एमपीसीबी व महापालिका ह्या दोघांचे संबंधातील मुद्याबाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी श्री.आंधळे यांनी नुमद केले की, महापालिकेवर अगोदरच खटला दाखल आहे. Environment of Perception ची नोटीस दाखल केलेली आहे. उच्च न्यायालयात पीआयएल चालू आहे. आधीच प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. महापालिकेवरती आणखी खटले दाखल करुन काही साध्य होणार नाही. महापालिकेने सदरची कामे करुन घेणे गरजेचे आहे. त्यांना यापुर्वीही दंड केला आहे. आता आणखी दंड करण्यासाठीचा प्रस्ताव आम्ही पाठवतो असे सांगितले.<br>• नियमानुसार कार्यवाही करावी. | प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ |
| | २) सध्याचे BOD, COD Value संबंधी निरिक्षणाबाबत विचारणा करण्यात आली.<br>सगळीकडे आता ZLD (शून्य निष्कर्षित यंत्रणा) असुन सद्या पावसामुळे डायल्युशन होत असल्याने काही आढळून येत नसल्याचे श्री.आंधळे यांनी नमुद केले.<br>• पावसाळा संपत आला असल्याने आता ऑक्टोबर नंतर नदीचा प्रवाह कमी होईल येथुन पुढे थोडे दक्ष होऊन तपासणी करावी. BOD, COD Value ज्या क्षमतेचे प्लान्टस आहेत किमान त्याच क्षमतेचा डिसचार्ज आहे किंवा नाही हे पहावे. प्रक्रिया न केलेले पाणी कोणी सोडणार नाही याची देखील पाहाणी करावी. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ<br><br>प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ |
| | ३) एमपीसीबीच्या समितीला औद्योगित क्षेत्रात व्हिजीट करण्यासंबंधी सुचना देण्यात आलेल्या होत्या त्याबाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत उपप्रादेशिक अधिकारी श्री.दुर्गुळे यांनी नमुद केले की, उपसमिती सदस्यांसमवेत २६ ऑगस्ट रोजी सातपुर व अंबड औद्योगिक क्षेत्रातील ६ ठिकाणी भेटी देऊन पाहणी केली आहे. सदरच्या उद्योगांमध्ये ZLD कशा पध्दतीने बसविली आहे व कशा पध्दतीने काम करते हे त्यांना दाखविण्यात आले. त्यामध्ये एमआयडीसी मधुन येणारा मोठ्या नाल्याचे सुध्दा Sampal घेतले आहे तो ही कमीटी सोबत पाहिला आहे.<br>• प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट सोडणारे आता किती उद्योग आहेत याबाबत विचारणा करण्यात आली.<br>४) प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट सोडणारा कुठलाही उद्योग नाही. तसे काही आढळले तर संबंधीतांवर कारवाई करण्यात येते असा श्री.दुर्गुळे यांनी खुलासा केला.<br><br>• यापुढे उपसमितीची ज्यावेळी व्हिजीट होईल त्यावेळी महापालिकेची उपसमिती व एमपीसीबीची उपसमिती अशा दोन्ही उपसमिती यांनी सातपुर, अंबड औद्योगिक क्षेत्रात संयुक्त भेटी कराव्यात. | प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ<br><br>प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ<br><br>एमपीसीबी उपसमिती, महापालिका उपसमिती |
| ३ | **महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्तरावरील उपसमिती संबंधीत मुद्दे-**<br>१) एमआयडीसी चे CETP संदर्भात केलेल्या कार्यवाहीची विचारणा करण्यात आली. | |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता श्री.बोरसे यांनी नमुद केले की, नागपुर निरीची टिम माहे सप्टेंबर मध्ये पाहणी करुन गेली असुन त्यांनी CETP ची जागा, आगरटाकळी येथील STP ची पाहाणी केली. तसेच एमपीसीबी, निरी व महापालिका यांची एक संयुक्त बैठक देखील घेतली आहे. त्यांनी काही सॅम्पल देखील गोळा केले असुन ते अहवाल देणार आहेत. CETP मधुन प्रक्रिया केलेले effluent निघेल ते महानगर पालिकेच्या STP ला किंवा ड्रेनेज लाईनला किंवा त्यांचे मॅन्होलला जोडता येईल का व ते तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य आहे किंवा नाही याबाबत निरीकडे अभिप्राय मागविले आहे. दिवाळीच्या आत अहवाल देण्यासाठी त्यांना विनंती केली आहे. त्यांचा अहवाल आल्यावर पुढची कार्यवाही करता येईल. सदर मुद्दा निकाली निघाल्यावर पुढची कार्यवाही एमआयडीसी करणार असल्याचे सांगितले.<br>• निरीशी संपर्क करुन अहवाल प्राप्त करुन घ्यावा. CETP बाबत एमआयडीसी, एमपीसीबी व महानगरपालिकाने समन्वयाने पुढील कार्यवाही करावी. | कार्यकारी अभियंता, म.औ.वि.महामंडळ<br><br>कार्यकारी अभियंता, म.औ.वि.महामंडळ, प्रादेशिक अधिकारी म.प्र.नि.मंडळ, आयुक्त महानगरपालिका |
| | २) एमआयडीसी यांना CETP बांधण्या बाबत असलेल्या अडीअडचणी संदर्भात सिव्हील ॲपलिकेशन दाखल करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या त्याबाबतीत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत श्री.बोरसे यांनी नमुद केले की, एमआयडीसीचा विधी विभाग आणि पर्यावरण विभागाने मान्यता दिली असुन आमच्या वकीलांकडे दाखल करण्यासाठी दिले आहे याआठवड्याभरात न्यायालयात सिव्हील ॲपलिकेशन दाखल होईल असे सांगितले.<br>• पुढील बैठकीपुर्वी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन त्याची प्रत सादर करावी. | कार्यकारी अभियंता, म.औ.वि.महामंडळ |
| ४ | **पोलिस विभाग संबंधीत मुद्दे-**<br>१) गोदावरी नदी प्रदुषण नियंत्रणाचे अनुषंगाने पोलीस विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत पोलिस आयुक्त कार्यालयाचे उपस्थित प्रतिनिधी श्री.के.बी.चौधरी, व.पो.नि. यांनी खुलासा केला की, माहे सप्टेंबर मध्ये एकुण ९३ केसेस कलम १८८ प्रमाणे केलेल्या असल्याचे सांगितले. दंडाची आकडेवारी जवळ उपलब्ध नसल्याचे सांगितले.<br>• पुढील वेळी दंडाच्या रक्कमेची आकडेवारी देखील देण्याबाबत सुचना देण्यात आली. | पोलिस आयुक्त<br><br>पोलिस आयुक्त |
| | २) मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार एक पुर्ण वेळ कार्यरत असलेले पथक देता येत नसल्याने त्याबाबत पोलिस विभागास असलेल्या अडचणी संदर्भात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्याबाबत विचारणा करण्यात आली.<br>सिव्हील ॲपलीकेशन दाखल केले नसलेबाबत उपस्थित प्रतिनिधी श्री.के.बी.चौधरी यांनी सांगितले.<br>• एक विशिष्ट रचना असलेले पथक पुर्ण वेळ सदर कामासाठी कार्यरत असले पाहिजे अशा मा. उच्च न्यायालयाच्या सुचना आहेत. स्वतंत्र पोलिस बळ देण्यास पोलिस विभागास ज्या काही अडचणी येत असतील त्या सिव्हील ॲपलिकेशन मध्ये नमुद करुन मा.उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणुन देण्यात याव्या. सिव्हील ॲपलिकेशन दाखल करण्याच्या सुचना देण्याची आता ही तिसरी बैठक आहे. पुढील बैठकीपूर्वी मा.उच्च न्यायालयात सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन त्याची प्रत सादर करण्यात यावी. | पोलिस आयुक्त<br><br>पोलिस आयुक्त |
| ५ | **जिल्हा परिषद स्तरावरील उपसमिती संबंधीत मुद्दे-**<br>श्रीमती वर्षा फडोळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. यांनी पुढील प्रमाणे माहिती दिली.<br>१) दि.३ ऑगस्ट २०२२ रोजी उपसमितीची गोवर्धन ग्रामपंचायत येथे बैठक झाली असल्याचे सांगितले. तसेच ओढा, एकलहरे व गोवर्धन या ३ ग्रामपंचायत येथे HAL ओझर यांच्या CSR च्या माध्यमातून तीन STP Plant चे काम पुर्ण झालेले आहे. सदरचे प्लांट HAL कडून अद्याप हस्तांतरीत झाले नसल्याचे सांगितले.<br>• २० गावांमध्ये STP बांधण्याच्या मुद्याबाबत विचारणा करण्यात आली. | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | STP बांधण्याकरीता स्वच्छ भारत मिशन मध्ये तेवढा निधी उपलब्ध नसल्याने त्यामधुन शक्य होत नाही. CSR मधुन बांधण्यासाठी आपण HAL कडे अजुन १५ गावांचे STP साठीची मागणी केली आहे. परंतु त्यांनी अजुन प्रतिसाद दिलेला नाही. सुला वाईन यांचेशी संपर्क केला होता. CNP व ISP प्रेस यांचेकडे देखील CSR मधुन मागणी केली आहे. तथापी अद्याप प्रतिसाद आलेला नाही. त्यांनी स्वत:हून फक्त घंटागाडीसाठीचा प्रस्ताव नेला असल्याचे श्रीमती फडोळ यांनी नमुद केले. | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद |
| | • ग्रामीण भागात गोंदे, मुसळगाव, दिंडोरी येथे काही मोठ्या इंडस्ट्रीज आहेत. ते आपलेकडील रस्ते, पाणी इत्यादी गोष्टी वापरतात. मोठ्या इंडस्ट्रीज यांचेशी संपर्क करुन त्यांचे CSR मधुन STP साठी मागणी करावी, पाठपुरावा करावा. जेणेकरुन उर्वरित गावांचे काम पुर्ण करता येतील व पुढील चांदोरी, सायखेडा गावांचा प्रश्न सुटेल. उर्वरीत STP बाबत लवकरात लवकर कार्यवाही पुर्ण करावी. | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद |
| | • तसेच दरम्यानच्या कालावधीत या गावांमध्ये प्लास्टीक कचरा व्यवस्थापन प्लांट कार्यान्वीत होऊ पावेतो या गावांचे प्लास्टिक गोळा करुन ते महानगर पालिकेच्या प्लांटला पाठविण्याची कार्यवाही समन्वयाने करावी. | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद |
| | ३) नदी पत्रात निर्माण होणाऱ्या पाणवेली काढून त्याच्या माध्यमातून केरळ येथे केलेल्या उपाययोजनांची पाहणी करण्या संबंधीत मुद्याच्या अनुषंगाने उपसमिती सदस्य व जिल्हा परिषद यांची टीम केरळला भेट देण्यासाठीचा प्रस्ताव तयार करुन राज्य शासनास परवानगीसाठी पाठविला आहे. अद्याप राज्य शासनाची परवानगी आलेली नसल्याचे श्रीमती फडोळ यांनी सांगितले. नदीकाठच्या गावाचे सरपंच व ग्रामसेवक यांना सुध्दा नेण्यात येणार असुन राज्याबाहेर जाण्यासाठी शासनाची परवानगी लागणार असल्याचे श्रीमती फडोळ यांनी नमुद केले. | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद |
| | • राज्य शासनास पाठविलेल्या परवानगी मागणीच्या पत्राची प्रत मला देण्यात यावी.<br>• मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परवानगी संदर्भात राज्य शासनाकडे पाठपुरावा करुन पुढील त्रैमासिक बैठकीपुर्वी उपसमितीचा केरळ येथे अभ्यास दौरा होऊन पाणवेली संदर्भात पर्याय समोर येईल याबाबत कार्यवाही करावी. जेणेकरुन ह्या टप्प्यावर नदीत पाणवेली वाढण्यापुर्वीच त्यावर उपाययोजना बाबत कार्यवाही करता येईल. | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद |
| ६ | **शिक्षण विभाग संबंधीत मुद्दे -** | |
| | १) गोदावरी नदी प्रदुषण नियंत्रण व जनजागुतीचे अनुषंगाने शहर व ग्रामीण भागातील शाळांमध्ये विविध उपक्रम, गोषवाक्य, रांगोळी स्पर्धा इ. राबविणेबाबतचा अहवाल शिक्षण उपसंचालक यांनी सादर केलेला असल्याचा खुलासा उपस्थिती प्रतिनिधी श्रीमती पाटील, सहा संचालक यांनी केला.<br>उल्लेखनिय व चांगले काम करणारे यांचा सत्कार, गौरव करण्याबाबत श्री.पंडीत यांनी मुद्दा मांडला. | शिक्षण उपसंचालक |
| | • ज्या-ज्या उपसमितीला गोदावरी नदी प्रदुषणासंदर्भात कोणत्याही क्षेत्रात उल्लेखनिय, चांगले काम करणाऱ्यांचा प्रातिनिधीक स्वरुपात सत्कार, प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावयाची असेल त्या उपसमिती यांनी आढावा बैठक सुरु होण्यापुर्वी पाच मिनटे अगोदर संबंधीतांचा सत्कार, प्रमाणपत्र देणे इत्यादीचा कार्यक्रम आयोजित करता येईल अशा सुचना देण्यात आल्या. | सर्व उपसमिती/यंत्रणा |
| | २) मनपा शिक्षण विभागासंबंधीत मागील बैठकीत दिलेल्या निर्देशांबाबत श्री.मुंडे यांनी नमुद केले की, निरिचे अहवाल व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशांचे मराठी भाषांतर करण्याचे काम महानगरपालिकेच्या शाळांकडे दिले आहे. परंतु त्यांच्याकडे प्राथमिक शाळा असुन तेवढा टेक्नीकल स्टाफ नसल्या कारणाने त्यांचेकडून भाषांतराचे काम करणे शक्य नसल्याचे श्री.मुंडे यांनी नमुद केले. | आयुक्त महानगरपालिका |
| | • मागील बैठकीत सदर कामाची जबाबदारी ही शिक्षण विभागास दिली असल्याने मनपा शिक्षण विभागाने शिक्षण उपसंचालक कार्यालयाशी समन्वय साधुन भाषांतराचे काम | आयुक्त महानगरपालिका शिक्षण उपसंचालक, |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | करुन घ्यावे. शिक्षण उपसंचालक यांचेशी चर्चा करुन पुढील कार्यवाही करावी. आवश्यकता पडल्यास माहिती उपसंचालक श्री.इगवे यांची मदत घ्यावी. | उपसंचालक माहिती |
| ७ | **रेडलाईन, ब्लयुलाईन मार्किंग बाबत मुद्दा —**<br>१) नदी पात्रालगत ब्लयु लाईन मार्कींग करणे बाबत श्री.पंडीत यांनी मुद्दा उपस्थित केला.<br>याबाबत मनपा आयुक्त यांनी नमुद केले की, ब्लयु लाईनच्या बाबतीत माहे डिसेंबर २१ मध्ये UDCPR आले असुन त्यामध्ये ब्लयु लाईन, रेडलाईन बाबतचे निर्देश शासनाने दिलेले आहेत त्याप्रमाणे कामे केली पाहिजे असा खुलासा केला. मार्किंगचे काम पुर्वी जलसंपदा विभागाने केलेले आहे. मार्किंग करण्याची जबाबदारी जलसंपदा विभागाची असल्याचे नमुद केले.<br>त्याअनुषंगाने जलसंपदा विभागाच्या अधिक्षक अभियंता श्रीमती अहिरराव यांनी नमुद केले की, या संबंधातील सर्व माहिती सन २००८ मध्येच महानगर पालिकेकडे दिली आहे. पुर्वी सदरचे काम झालेले आहे. मार्किंग करण्याचा विषय सद्यास्थिती आमचेकडे नाही. तसेच मार्किंगसाठी निधी लागणार असल्याचेही नमुद केले.<br>• यापुर्वी पुराबाबत बैठक झाली होती. त्यामध्ये धरणातुन सोडण्यात येणाऱ्या पुर पाण्याच्या अनुषंगाने नदी काठच्या नागरीकांना जागेवरती कळण्यासाठी पुररेषा मार्किंग बाबत चर्चा झाली होती. पुररेषा मार्क करतांना जागेवरती रेडलाईन, ब्लयुलाईन मार्क केली तर त्यावरुन पुर रेषेत कुठे काम सुरु असेल तर नागरिकांना लगेच कळेल. त्यामुळे काम सुरु होतांनांच तक्रार आली तर त्यावर पटकन कारवाई करता येईल. तसेच किती क्युसेक पाणी सोडल्यावर कुठे पर्यंत पाण्याची पातळी राहील हे ही नागरीकांना कळेल. मार्किंग बाबत आता महानगर पालिका व जलसंपदा विभाग यांनी समन्वयाने कार्यवाही करावी. | आयुक्त महानगरपालिका<br><br>अधिक्षक अभियंता जलसंपदा विभाग<br><br>आयुक्त महानगरपालिका<br>अधिक्षक अभियंता<br>जलसंपदा विभाग |
| ८ | **रिटेनिंग वॉल संदर्भात मुद्दा —**<br>१) यापुढे गोदावरी नदी किंवा तीचे उपनद्यांवर रिटेनिंग वॉल बांधायची असेल तर सिमेंटचा नदीपात्रात वापर न करता गॅबीयन वॉल बांधायची असलेबाबत श्री.पंडीत यांनी मुद्दा उपस्थित केला.<br>तसेच स्मार्ट सिटीने नदी पात्रात सिमेंटची भिंत बांधली असल्याने सदर मुद्दा कोर्टात असल्याचे श्री.पगारे यांनी नमुद केले.<br>• रिटेनिंग वॉल बाबत निरीचे अभिप्राय घेतल्या शिवाय काम करायचे नाही. यापुढे महापालिकेकडून बांधकाम परवानगी देतांना तसेच जिथे नाला ट्रीटमेंट वैगरे दिली जाते अथवा नाला वरुन बंद केला जातो त्यासाठी महापालिकेने नियमावली तयार करावी. नाला वरील बाजुने बंद केला तर त्यावरुन रस्ता जाऊ द्यायचा नाही.<br>२) लेंडी नाल्याच्या वरच्या बाजुस स्मार्टसिटीने बांधलेल्या भिंतीचे पुढे थोडी माती टाकून पात्र अरुंद करीत असले बाबत श्री.पगारे यांनी मुद्दा मांडला.<br>• महानगर पालिकेच्या उपसमितीची ज्यावेळी व्हिजीट होऊल तेव्हा उपसमिती सदस्य, एमपीसीबी व जलसंपदा विभागाने एकत्रित पाहणी करावी व महानगरपालिका आयुक्त यांनी सदर मुद्दा बाबत पुढील कार्यवाही करावी. | आयुक्त महानगरपालिका<br><br>महापालिका उपसमिती,<br>प्रादेशिक अधिकारी<br>म.प्र.नि.मंडळ,<br>अधिक्षक अभियंता<br>जलसंपदा विभाग,<br>आयुक्त महानगरपालिका |
| ९ | **नाशिक औष्णिक विद्युत केंद्र एकलहरे संबंधीत मुद्दा —**<br>१) महापालिका हद्दीतील STP मधुन निघणाऱ्या पाण्यावर प्रकल्प चालविणे संबंधीच्या मुद्याबाबत विचारणा करण्यात आली.<br>याबाबत उपस्थित प्रतिनिधी श्री.झाल्टे वरिष्ठ रसायनतज्ञ यांनी नमुद केली की, महानगरपालिकेच्या हद्दीतील STP मधील निघणारे पाण्याचा वापर पावरस्टेशन मध्ये करण्याच्या MERC च्या गाईडलाइन आहेत. त्याप्रमाणे मुख्यालयावरुन ह्या प्रोजेक्टवर | ना.औ.वि.कें. एकलहरे |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | IIT मुंबई ची टीम येऊन गेली असुन त्यांनी त्यासंदर्भात पुर्ण माहिती जमा करुन तो प्रस्ताव मुख्यालयाला पाठविलेला आहे. त्यावर कार्यवाही सुरु आहे. अद्याप मुख्यालयावरुन काही उत्तर आलेले नसल्याचे सांगितले.<br>• सदर मुद्याबाबत मुख्यालयावरुन जी कार्यवाही होईल त्याबाबत अहवाल सादर करावा. | ना.औ.वि.कें. एकलहरे |
| १० | **नाशिक म्युनसिपल स्मार्ट सिटी डेव्ह. कॉर्पोरेशन लि. संबंधीत मुद्दे –**<br>श्री.मोरे, मुख्य कार्यकारी अधिकारी, ना.म्यु.स्मार्ट सिटी यांनी पुढील प्रमाणे माहिती दिली.<br>१) नदीपात्राचे लगत सुलभ शौचालय/ई-टॉयलेट बसविण्याबाबतचा मुद्दा होता. त्याअनुषंगाने नदी पात्रालगत १० सुलभ शौचालय/ई-टायलेट बसविण्याबाबत ठेकेदाराला वर्कऑर्डर देण्यात आलेली आहे. सदरची १० ठिकाणे महापालिकेकडून निश्चित करुन घेण्यात आलेली असुन त्याप्रमाणे सुलभ शौचालय/ई-टॉयलेट बसविण्यात येत असल्याचे श्री.मोरे यांनी खुलासा केला.<br>• नदीपात्रालगत सुलभ शौचालय/ई-टॉयलेट बसविण्याची कार्यवाही लवकर पुर्ण करावी. | मुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी |
| | २) लेंडी नाल्याच्या पाईपचे डिझाईन बाबत व पुरामध्ये रामकुंडावरील काही ठिकाणाच्या फरश्या वाहुन गेल्याबाबत आर्किटेक्चर कॉलेजच्या प्राचार्या श्रीमती बस्ते यांचे भेटी संबंधीचा मुद्दा होता. त्याअनुषंगाने श्रीमती बस्ते मॅडम यांची या महिन्यात १२ तारखेला व्हीजीट झाली आहे. श्रीमती बस्ते मॅडम यांनी जागोजागी पाहणी केली. त्यांच्या व्हीजीटमध्ये रामकुंड आणी गांधी तलावमध्ये पाण्याच्या हॅमरिंगमुळे ज्या फरश्या निघत होत्या त्याठिकाणी edge protection केल्याच त्यांना दाखविण्यात आले असुन त्याठिकाणी आता ह्या पावसाळ्यात कुठलाही दगड निघाला नसल्याचे पण त्यांना दाखविले असल्याचे श्री.मोरे यांनी सांगितले.<br>• श्रीमती बस्ते यांच्या भेटीचा अहवाल प्राप्त करुन घ्यावा व त्यातील सुचनेप्रमाणे कार्यवाही करावी. | मुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी |
| | ३) रामसेतू पुलाबाबत जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त व पोलिस आयुक्त यांचे समितीची भेट झाली. रामसेतु पुलाबाबतचे स्ट्रक्चर ऑडिट करण्यासाठी VJTI यांना कळविण्यात आले आहे. त्यांची टिम या महिन्यात ८ तारखेला येऊन गेली असुन त्यांचा अहवाल अप्राप्त असल्याचे श्री.मोरे यांनी नमुद केले.<br>• अहवाल प्राप्त करुन घ्यावा व नदी पात्रातील De-concretization करणेसंबंधी राहीलेले काम पुर्ण करण्याची कार्यवाही करावी. | मुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी |
| | ४) गोदावरी नदीत बांधलेल्या रिटेनिंग वॉल संदर्भात श्री.पगारे यांनी तक्रार दिलेली होती. त्याबाबत शहर अभियंता श्री.वंजारी यांची व्हीजीट झाली असुन NEERI ने दिलेल्या सुचना नुसार काम केलेले असल्याचे त्यांचे निदर्शनास आणुन दिले आहे असे श्री.मोरे यांनी सांगितले.<br>• सदर बाबतचा अहवाल सादर करावा. | मुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी, आयुक्त महानगरपालिका |
| | ५) गोदावरी नदीत सोडत असलेल्या सांडपाण्याबाबत लेंडी नाल्या संदर्भात श्री.पगारे यांची तक्रार होती. त्याअनुषंगाने लेंडी नाल्याचे पुढचे सर्व काम केलेले असुन पुढील बाजुचे सर्व पाणी बंद केलेले असल्याचे श्री.मोरे यांनी नमुद केले.<br>• महानगर पालिका व स्मार्ट सिटी दोघांनी समन्वयाने नाल्यावरील अतिक्रमण काढून घेऊन उर्वरित काम तातडीने पुर्ण करण्याची कार्यवाही करावी. सदर ठिकाणी Raw water येणार नाही याची काळजी घ्यावी. | मुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी, आयुक्त महानगरपालिका |
| | ६) निळकंठेश्वर महादेव मंदीरा समोरच्या पायऱ्या तोडल्या बाबत तक्रार होती. त्याबाबत सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग यांचे मार्गदर्शन व सुचनेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. सद्यस्थितीत पाणी असल्याने पाणी कमी होताच पुढील काम करण्यात येईलअसा स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला.<br>• पुरातत्व विभागाचे मार्गदर्शन प्रमाणे सदरचे कामकाज लवकर पुर्ण करावे. | मुख्य कार्यकारी अधिकारी स्मार्ट सिटी |

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ११ | **गोदावरी प्रदुषण नियंत्रण प्रचार व प्रसिध्दी स्तरावरील उपसमिती –**<br>गोदावरी संबधातील प्रचार व प्रसिध्दीच्या अनुषंगाने वृत्तपत्रातील कात्रणांचा अहवाल पाठविलेला आहे.<br>गोदावरी नदीच्या प्रदुषणाच्या संदर्भात कालच श्री.पंडीत यांची आकाशवाणीवर मुलाखत घेतली असल्याचे उपसंचालक श्री.इगवे यांनी सांगितले.<br>• गोदावरी नदीचे प्रदुषणाच्या अनुषंगाने जनजागृती व प्रचार प्रसिध्दीचा अहवाल नियमित सादर करावा. | उपसंचालक माहिती<br><br>उपसंचालक माहिती |
| १२ | उंडवाडी येथील नंदीनी नदीच्या पुलाजवळ शिट्टी मारुन लोकांना नदीपात्रात कचरा टाकण्यापासुन परावृत्त करण्याचे मॉरल पोलिसिंगचे काम करणारे श्री.चंद्रशेखर पाटील यांना श्री पंडीत यांनी आमंत्रित केले होते. बैठकीत उपस्थित सर्वांनी श्री.चंद्रशेखर पाटील हे करीत असलेल्या कामाची माहिती करुन घेतली.<br>• २६ जानेवारीला पालिकेतर्फे स्वच्छता दुत म्हणुन पुरस्कार देणेसंबंधी महापालिका आयुक्त यांना सुचना देण्यात आली. | आयुक्त महानगरपालिका |
| १३ | रामकुंडातील पाण्यात फेस येत असलेबाबत दि.१०/१०/२०२२ रोजी वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झाली असलेबाबत श्री.पगारे यांनी मुद्दा उपस्थित केला.<br>• याबाबत महानगर पालिका आयुक्त यांनी पुढील कार्यवाही करावी. | आयुक्त महानगरपालिका |
| १४ | **नदीच्या पुलांवर जाळया बसविणेबाबत उपस्थित मुद्दा –**<br>याबाबत फेज वाईज काम सुरु असुन वरच्या भागातील नद्यावरील पुलांवर जाळ्या बसविण्याचे काम पुर्ण झाले असुन खालील भागातील पुलांवर जाळ्या लावण्याचे कामकाज करण्यात येत असल्याचे श्री.मुंडे यांनी सांगितले.<br>• पुलावरुन निर्माल्य नदीत फेकता येऊ नये यासाठी सर्व नद्यांवरील जाळ्या बसविण्याची कार्यवाही लवकर पुर्ण करावी. | आयुक्त महानगरपालिका<br><br>आयुक्त महानगरपालिका |
| १५ | तसेच दि.२७/०७/२०२२ रोजीचे इतिवृत्तातील उर्वरित मुद्यांवर दिलेल्या सुचनेप्रमाणे संबंधित यंत्रणा यांनी योग्यती कार्यवाही करुन त्याबाबतचे अहवाल सादर करावेत. | सर्व उपसमिती व संबंधीत विभाग/अधिकारी |

वरील प्रमाणे चर्चा होऊन सभेचे कामकाज संपविणेत आले.

25/10/22

(राधाकृष्ण गमे)
विभागीय आयुक्त, नाशिक

स्थळ:- नाशिकरोड
दि.25/10/2022
क्र.कक्ष-15/क.शु./ज.या.176-2012/362/2022

प्रत :- सर्व संबधीत..

Scanned by CamScanner